
ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांचे चिकित्सक विश्लेषण

लीलाधर बन्सोड

संशोधक, जनसंवाद विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर.




**प्रस्तावनाः-**

भारतीय चित्रपट हा एकमेव जनसामान्यांचा सर्वात मोठा प्रभावी संवादाचा माध्यम असून जवळपास १२ लाख लोकं हे दर आठवड्याला चित्रपटगृहात आणि मल्टिप्लेक्समध्ये चित्रपट बघत असतात. एका मोठ्या लोकसंख्येच्या मनोरंजाचे माध्यम म्हणून चित्रपट उद्योगाकडे पाहिले जाते. चित्रपट हे जनसंवादाचे प्रभावी आणि मोठे साधन असल्यामुळे प्रेक्षकांचे मनोरंज व्हावे या गरजेतून चित्रपट निर्मिती करणे हे या चित्रपट उद्योगाचे प्राथम्य ठरलेले आहे. बॉम्बे चित्रपट उद्योग हा पुरुषप्रधान चित्रपट उद्योग आहे. हिंदी चित्रपटांमध्ये पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेवर आधारीत पुरुषकेंद्री चित्रपटांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती झाल्याचे दिसुन येते आणि त्यामुळेच या चित्रपटांध्ये स्त्रियांना दुय्यम दर्जा देण्यात आला किंवा त्यांच्या वाट्याला या दुय्यम दर्जाच्या भूमिका आल्या आहेत. पूर्वीपार चालत आलेल्या रुढी परंपरा आणि चाकोरीबध्द , जीवन यांचे अंतरंग उलगडण्याचे काम चित्रपटरुपाने .पडद्यावर साकारण्याचा प्रयत्न केला गेला आहे भोगविलासी साधने किवा प्रेमाचे आकर्षणाची केंद्रे म्हणून चित्रपटांमध्ये स्त्रियांचे स्थान निश्चित करण्यात सती .आले आहेसावित्री राणी आणि पती , सेवेकरिता सर्वस्व अर्पण करण्याची तयारी ठेवणाऱ्या या स्त्रियांच्या भूमिकांचे सादरीकरण चित्रपटांतून केले आहे .असे जरी असले तरी वर्तमानकाळातील चित्रपटांमध्ये स्त्रियांच्या भूमिकांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. स्त्रियांच्या भूमिका या बदलाच्या दिशेने मार्गक्रमन करित आहेतनाचगाण्यापलीकडेही . या नायिकांनी उत्तम भूमिका साकारुन आपले एक ही त्यांची जमेची .वेगळे स्थान निर्माण केले आहे बाजू आहे. प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून मागील ६० वर्षामध्ये हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांमध्ये झालेल्या बदलाचे चिकित्सक विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**साहित्याचा आढावा :**

भारतीय चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांच्या विकासाबद्दल लक्ष्मी (१९९१) यांनी म्हटल्याप्रमाणे, भारतीय चित्रपटांमध्ये स्त्रियांच्या भूमिका या दादासाहेब फाळके यांच्या ***राजा हरिश्चंद्र*** मधील निष्क्रिय पत्नी ते आईच्या भूमिकेतील ***मदर इंडिया*** ते ***मदर ९८*** मधील एकेरी पालकत्वाच्या भूमिकेत असणारी आई हे एक अद्भूत असून तो एक आव्हानात्मक प्रवास आहे. १९६० पासून भारतीय समाजातील पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या समस्या जशा जशा समोर येत गेल्या तश- तशा त्यांच्या भूमिका चित्रपटांच्या माध्यमातून आकारास येऊ लागल्या. यापैकी अधिकांस चित्रपटात समाजातील महिलांच्या समस्यांना घेऊन हुंडा, विधवागृह, बलात्कार या अशा अनेक भूमिका चित्रपटांतून साकारण्यात येऊ लागल्या होत्या. विशेष म्हणजे हे चित्रपट व्यावसायिक उच्चांक गाठू शकले नाहीत तसेच अधिकाअधिक प्रेक्षकांपर्यंत ते पोहचू शकले नाहीत. (नंदकुमार, २०११) दुसरे म्हणजे हे असे चित्रपट फक्त महिला आणि त्यांच्या समस्यामध्येच गुंतलेले होते. (बुटालिआ, १९८४) त्यामुळे जरी या चित्रपटांच्या माध्यमातून महिलांच्या समस्या पडद्यावर साकारण्यात आल्यात तरी त्या महिलांच्या दृष्टिकोनातून साकारल्या नसून पुरुष पात्र किंवा नायक हे त्या परिस्थीतीला कसे समोर जाऊन त्यांचा सामना करतात यावरच अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले होते.

१९२० ला पहिल्यांदा भारतीय चित्रपटामध्ये महिलांनी अभिनय केला आहे. अभिनय करणाऱ्या या महिला अँग्लो इंडियन होत्या. त्यामुळे मुळ भारतीय महिलांच्या तुलनेत या महिला वेगळ्या होत्या. (गंटी, २००४) त्याचबरोबर भारतीय चित्रपट उद्योगात प्रेक्षकांना भारतीय प्रस्थापित

समाजमुल्यांची जपणूक होताना आवडेल अशाच भूमिका महिलांनी पडद्यावर साकाराव्यात याची सुरुवात झाली होती. (नंदकुमार, २०११) महिलांनी पडद्यावर कोणत्या भूमिका साकारल्यात त्यापेक्षा पुरुष दिग्दर्शकांनी त्यांना कोणत्या भूमिका पार पाडायला सांगितल्या हे अधिक महत्वाचे समजले जाते. कारण पुरुष दिग्दर्शकांनी महिलांना ज्या पडद्यावर भूमिका साकारायला भाग पाडले त्या एकुणच त्या पुरुष दिग्दर्शकांवर समाजमनाचा झालेला परिणाम, समाजातील नितीमुल्य, विश्वास यांचा अधिक प्रभाव असून प्रेक्षकांना काय आवडेल या दृष्टिकोनातूनच त्यांनी महिलांचे सादरीकरण पडद्यावर केले आहे. याबद्दल १९६८ साली मिल्टन रॉकिच यांनी त्यांच्या सिध्दांतामध्ये विश्वासहार्यता, वागणूक आणि मुल्ये यांचे अधिक सविस्तर विश्लेषण केले आहे. ( सौम्या नंदकुमार, २०११)

चित्रपटाच्या माध्यमांतून प्रेक्षकांपर्यत जे कथा पोहचविल्या जातात त्या कथानकांमधून स्त्रियांच्या प्रतिमा प्रेक्षकांपर्यंत कशा पध्दतीने पोहचविल्या जातात किंवा प्रेक्षकांपर्यंत कोणता संदेश पोहचविला जातो हे पाहणेही महत्वाचे असल्याचे सौम्या नंदकुमार यांनी त्यांच्या शोध निबंधामध्ये मांडले आहे. *'महिलांचे सादरीकरण'* ही संज्ञा चित्रपट क्षेत्रात *ऑफ स्क्रीन* आणि *ऑन स्क्रीन* म्हणजेच पडद्यामागे आणि पडद्यावर करिअर करु पाहणाऱ्या महिलांच्या बाबतीत वापरली जाते. (नंदकुमार, २०११)

भारतीय चित्रपटांमधील स्त्रियांचे चित्रिकरण हे मूक सिनेमा ते आजमितीच्या व्यावसायिक चित्रपटांमध्ये भरपूर बदल झालेले आढळून येतात. तरी या बदलाला न जुमानता आजही चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिका ह्या दुय्यम दर्जाच्या असल्याच्या आढळून येतात. यामागच्या सर्वसाधारण कारणांमागे जाणकारांचे मते, स्त्रियांच्या या चित्रिकरणाला किंवा सादरीकरणामागे फक्त ऐतिहासिक आणि सांस्कृतिक कारणेच जबाबदार असल्याचे सांगतात. ( गोकुलसिंग आणि दिसनायके २००४) प्रारंभी स्त्रियांनी चित्रपटांमध्ये काम करणे म्हणजे नारी जातीला कलंक लावणे असे समजले जात होते. (गंटी २००४) त्यामूळे स्त्रियांनी जेव्हापासून काम करायला सुरुवात केली तेव्हापासूनच दिग्दर्शकांनी सामाजिक नियम आणि सामाजिक दृष्टिकोनातून स्त्रियांना चित्रपटांमध्ये सादर केल्याचे दिसून येते. अधिकाअधिक महिला या लहान बहिणीच्या भूमिकेत (लहान भावाची काळजी घेणे, आईला स्वयंपाकात मदत करणे, घरकामात लक्ष देणे आणि वडिलांनी निवडलेल्या मुलाशी लग्न करणे ) आदर्श पत्नी ( घरकामात दक्ष, कुटुंबाची सर्व काळजी घेणारी आणि पतीच्या निधनांतर संपूर्ण आयुष्य पतीच्या स्मरणामध्ये काढणारी आणि आई म्हणून समर्पणाच्या भूमिकेत स्त्रियांचे सादरीकरण करण्यात आले आहेत. (गोकुलसिंग आणि दिसनायके २००४) महिलांच्या चित्रपटातील सादरीकरणाबाबत *मनूस्मृती* या पुराणग्रंथालाही जाणकारांनी कारणीभूत असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या मते स्त्रीला कधीही स्वातंत्र्य अबाधित करण्यात आले नव्हते, स्त्रीने फक्त आज्ञाधारक राहून सपर्पण आणि त्यागाच्या भूमिकेत राहून तीला लग्नाआधी वडिलांच्या तुलनेत दुय्यम स्थान, लग्नानंतर पतीच्या तुलनेत दुय्यम दर्जा आणि पतीच्या निधनांतर मुलांवर अवलंबून राहून दुय्यम स्थानी राहावे लागत असे. (गोकुलसिंग आणि दिसनायके २००४) या अशा चित्रपटांमध्ये आदर्श पत्नीच्या भूमिका या पौराणिक कथानुकांनुसार घेतले जात होते. ज्यामध्ये सावित्री, सिता या पतीसेवेसाठी आणि पतीच्या चरणी सर्वस्व अर्पण करुन स्वतःच्या इच्छा – आकांक्षा, स्वतःचे सुख आणि आनंद या सर्वांचा त्याग करुन पतीच्या सेवेत राहून आदर्श स्त्री म्हणून भूमिका निभावली आहे. एवढच नाही तर ही आदर्श पत्नी लैंगिकदृष्या पवित्र आणि शुध्द तसेच निष्ठावान असावी असेही सांगितले जायचे. (गोकुलसिंग आणि दिसनायके २००४) चित्रपटांचा हा मुख्य विषय पुरुषप्रधान समाजव्यवस्थेला वृध्दींगत करत होता. (नंदकुमार २०११) भारतीय चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकेतील वास्तविकता ही स्त्रीचे लग्न, सामाजिक आणि वैयक्तिक ओळख याच्याशी संबंधित होती. लग्न ही परंपरागत कर्तव्याचीच जाणीव नाही तर त्यांच्या इतर मौलिक अधिकाराचीही शिकवणीसाठी जबाबदारी होती. (चक्रवर्ती १९८९ पान.क्र.४६-४७) हिंदी चित्रपटांमध्ये स्त्रीने साकारलेली भूमिका ही पुरुषासाठीच्या इच्छा केंद्र किंवा पुरुषांसाठी म्हणून साकारण्यात आल्या आहेत. हे सादरीकरण हॉलीवूडच्या धर्तीवर साकारलेले असल्याचे पेंडाकूर म्हणतात. पुरुषांच्या लैंगिक आकर्षणापोटी स्त्रियांच्या भूमिका या 'आदीवासी पोशाखात' आणि 'ओल्या साडीत' नाचताना दाखविल्या आहेत. ( गोकुलसिंग आणि दिसनायके २००४) ७०, ८० आणि ९० च्या दशकात मुख्य प्रवाहातील भारतीय चित्रपटांमध्ये स्त्रियांना हिरोईनचा दर्जा देण्यात आला. मुख्यप्रवाहातील चित्रपटांमध्ये जेव्हा स्त्रियांना हिरोईनचा दर्जा देण्यात आला तेव्हा मात्र त्यांना अभिनेत्रीपेक्षा ग्लॅमर डॉल, नायकांसोबत झाडाभोवती बागेत नाचणे आणि कॅब्रे डांसर म्हणून अशा काही भूमिका त्यांच्या वाटयाला आल्यात.

आज प्रसिध्द दिग्दर्शक मीरा नायर, दीपा मेहता आणि मेघना गुलजार यांनी भारतीय समाजव्यवस्थेमधील वर्जित घटकांवर बोट ठेउन चित्रपट तयार केले आहेत. त्यांनी त्यांच्या चित्रपटांच्या माध्यमातून स्त्रीसमलैंगिकता, बहुविवाही, पर्यायी मातृत्व या वादग्रस्त विषयांना हाताळण्याचे एक मोठे धाडसी प्रयत्न केले आहे. या चित्रपटांमध्ये स्त्रियांनी प्रेम, मातृत्व एवढच नाही तर पतीच्या परवानगी शिवाय आपले गर्भ भाड्याने देण्याच्याही मोठ्या आव्हानात्मक भूमिका साकारल्या आहेत. तसेच ***फायर*** आणि ***कामसुत्र*** या चित्रपटांच्या माध्यमातून स्त्रियांच्या लैंगिक सुखाच्या सुप्त इच्छांना जगासमोर मांडण्याचाही प्रयत्न केला गेला आहे. महेश मांजरेकर यांच्या ***अस्तित्व*** चित्रपटामध्ये तर या विषयाला मोठ्या संवेदनेने हाताळण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**संशोधन समस्या :**

हिंदी चित्रपटांतील स्त्रियांच्या भूमिकांबद्दल प्रतिसादकांचा अभिप्राय काय आहे ?

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांबद्दल प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादावरून गेल्या ६० वर्षांमध्ये हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकामध्ये कोणते बदल झाले आहेत, सुरुवातीपासूनच्या ठराविक किंवा पठणीतल्या (Stereotypes) भूमिकामध्ये कालपरत्वे कसे बदल जाणवत गेले तसेच चित्रपटातील नायिकांना फक्त ग्लॅमर डॉल म्हणून, किंवा मेंदूहिन व्यक्ती किंवा चित्रपटातील त्यांची हजेरी ही दुय्यम दर्जाची आहे का हे जाणून घेण्यासाठी त्यांच्या भूमिकांचे चिकित्सक विश्लेषण करणे हे प्रस्तूत संशोधनाची उद्दिष्ट्ये आहेत.

**कार्यात्मक व्याख्या** :

**महिलांची / स्त्रियांची भूमिका** – हिंदी चित्रपटांमध्ये महिला पात्रांनी निभावलेली भूमिका

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत संशोधन हे प्रतिसादकांच्या हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकाबद्दल दिलेल्या अभिप्रायाशी निगडीत आहे.त्यामुळे हे वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये मोडत आहे. (पंड्या, एस.आर. २०१०) तसेच प्रतिसादकांनी दिलेल्या अभिप्रायावरुन याची मांडणी ही अन्वेषणात्मक सर्वेक्षणातून करण्यात आली आहे.

**नमुना निवड :**

प्रस्तूत संशोधन विषयासाठी यादृच्छिक पध्दतीने एकुण ६७ उत्तरदाते निवडण्यात आले असून त्यामध्ये ९ पुरुष आणि ५८ महिला यांचा समावेश आहे. त्यामध्ये पाच उत्तरदाते हे अनुसुचित जाती या प्रवर्गातील असून ३४ पदवी आणि २८ पदव्युत्तर आहेत. नमुना निवड हे मुंबई उपनगर येथील आहेत.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तूत हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांचे चिकित्सक विश्लेषण या संशोधन विषयासाठी एकुण विविध ५६ प्रश्न आणि उपप्रश्नांची उत्तरे प्रतिसादकांकडून प्रश्नावलीच्या स्वरुपातून भरून घेण्यात आली. यामध्ये उत्तरासाठी पाच-घटकीय प्रतिसाद श्रेणीचा (five-point response categories) वापर करण्यात आला आहे. ज्यामध्ये पूर्णपणे मान्य, मान्य, अनिश्चित, अमान्य आणि पूर्णपणे अमान्य या श्रेणी करण्यात आल्या आहेत. यामध्ये *क्रोनबॅकच्या अल्फा मेथड* पध्दतीचा वापर करण्यात आला असून याची अंतर्गत संलग्नित विश्वसनीयता ही ०.७८ एवढी असून ऑनलाईन रिअलॅबिलीटी कॅल्क्युलेटर पध्दतीने पडताळणी करण्यात आली आहे. (http://researchbasics.education.uconn.edu/excel-spreadsheet-to-calculate-instrument-reliability-estimates/ पुनर्पादित ५ ऑक्टोबर, २०१६). ज्यामध्ये या पाच घटकीय श्रेणीचे कमीतकमी आणि जास्तीत जास्त ५६ आणि २८० एवढे मुल्य येत आहे. यामध्ये सर्वाधिक मुल्य हे प्रतिसादींच्या हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकाबद्दलच्या अभिवृत्तीला अधोरेखित करीत आहे.


**माहितीचे विश्लेषण :**

**प्रश्न क्रमांक १ : मागील ६० वर्षांत स्त्रियांच्या चित्रपटातील भूमिकामध्ये काही बदल झालेला नाही.**

प्रतिसादकांकडून मिळालेला प्रतिसाद खालीलप्रमाणे –

**तक्ता क्रमांक १ ) हिंदी चित्रपटातील स्त्रियांची ६० वर्षातील भूमिका**

| प्रतिसाद श्रेणी | पूर्णपणे मान्य | मान्य | अनिश्चित | अमान्य | पूर्णपणे अमान्य | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | -- | ८ | १ | ३९ | १९ | ६७ |
| टक्केवारी | -- | ११.९४ | १.४९ | ५८.२१ | २८.३६ | |




प्रतिसाद श्रेणीची उत्तरे या पाच प्रतिसाद श्रेणीमध्ये समानपणे वितरीत झाली आहे की नाही, ते शोधण्यासाठी '***काय वर्ग***' काढण्यात आला असून त्याची $\chi^2$ गणना करण्यात आली असून असे निदर्शनास आले की, $\chi^2$ = ७८.३ एवढे असून ते (P = 0.0001) एवढे लक्षणीय आहे. त्यामुळे असे निदर्शनास येते की, प्रतिसादाचे समान वितरण झाले नाही. बहुतांश प्रतिसादक या विधानाशी सहमत होत नाही उदाहरणादाखल ५८ (८६.५७) या आकड्यावरुन असे लक्षात येते की,वरील विधानाला प्रतिसादकांनी मान्य किंवा पूर्णपणे अमान्य केले आहे.

**निष्कर्ष :**


वरिल नमुद सामुग्रीच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, मागील ६० वर्षामध्ये हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांमध्ये बदल झालेला आहे.

**प्रश्न क्रमांक २ : भारतीय चित्रपटांमध्ये स्त्रीला `ग्लॅमर डॉल' म्हणून दाखविण्यात येत आहे.**

प्रतिसादकांकडून मिळालेला प्रतिसाद खालीलप्रमाणे –

**तक्ता क्रमांक २ ) हिंदी चित्रपटातील स्त्रियांची ग्लॅमर डॉलची भूमिका**

| प्रतिसाद श्रेणी | पूर्णपणे मान्य | मान्य | अनिश्चित | अमान्य | पूर्णपणे अमान्य | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | १ | ३ | २ | ४५ | १६ | ६७ |
| टक्केवारी | १.४९ | ४.४८ | २.९८ | ६७.१६ | २३.८८ | |




प्रतिसाद श्रेणीची उत्तरे या पाच प्रतिसाद श्रेणीमध्ये समानपणे वितरीत झाली आहे की नाही, ते शोधण्यासाठी '***काय वर्ग***' काढण्यात आला असून त्याची $\chi^2$ गणना करण्यात आली असून असे निदर्शनास आले की, $\chi^2$ = १०४.२७ एवढे असून ते (P <0.0001) एवढे लक्षणीय नाही. त्यामुळे असे निदर्शनास येते की, प्रतिसादाचे समान वितरण झाले नाही. मोठ्या संख्येने प्रतिसादक या विधानाशी सहमत होत नाही उदाहरणादाखल ६१ (९१.०५ % ) या आकड्यावरुन असे लक्षात येते की,वरील विधानाला प्रतिसादकांनी मान्य किंवा पूर्णपणे अमान्य केले आहे.

**निष्कर्ष :**


वरिल नमुद सामुग्रीच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांमध्ये बदल झालेला असून त्या फक्त ग्लॅमर डॉल म्हणूनच त्यांचे चित्रण पडद्यावर साकारले जात नाही.

**प्रश्न क्रमांक ३) : आताच्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये स्त्रीयांच्या भूमिकांमध्ये बदल होत असून त्यांना विविध भूमिका देण्यात येत आहेत.**

प्रतिसादकांकडून मिळालेला प्रतिसाद खालीलप्रमाणे –

**तक्ता क्रमांक ३ ) हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या विविध भूमिका**

| प्रतिसाद श्रेणी | पूर्णपणे मान्य | मान्य | अनिश्चित | अमान्य | पूर्णपणे अमान्य | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | १० | ५४ | २ | -- | १ | ६७ |
| टक्केवारी | १४.९३ | ८०.६० | २.९९ | -- | १.१४९ | |



प्रतिसाद श्रेणीची उत्तरे या पाच प्रतिसाद श्रेणीमध्ये समानपणे वितरीत झाली आहे की नाही, ते शोधण्यासाठी '***काय वर्ग'*** काढण्यात आला असून त्याची $\chi^2$ गणना करण्यात आली असून असे निदर्शनास आले की, $\chi^2$ = १५८.४५ एवढे असून ते (P <0.0001) एवढे लक्षणीय आहे. त्यामुळे असे निदर्शनास येते की, प्रतिसादाचे समान वितरण झाले नाही. मोठ्या संख्येने प्रतिसादक या विधानाशी सहमत होत नाही उदाहरणादाखल ६४ (९५.५३ % ) या आकड्यावरुन असे लक्षात येते की,वरील विधानाला प्रतिसादकांनी मान्य किंवा पूर्णपणे अमान्य केले आहे.

**निष्कर्ष :**


वरिल नमुद सामुग्रीच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांमध्ये बदल झालेला असून त्या विविध अंगानी चित्रपटामध्ये भूमिका साकारत असतात.

**प्रश्न क्रमांक ४) भारतीय चित्रपटात विशेषत: हिंदी चित्रपटात स्त्रियांना विना मेंदू असल्याचे दाखविण्यात येत आहे.**

प्रतिसादकांकडून मिळालेला प्रतिसाद खालीलप्रमाणे –

**तक्ता क्रमांक ४ ) हिंदी चित्रपटातील स्त्री पात्रांना मेंदूहिन असल्याचे सादरीकरण**

| प्रतिसाद श्रेणी | पूर्णपणे मान्य | मान्य | अनिश्चित | अमान्य | पूर्णपणे अमान्य | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | १६ | २३ | ६ | १८ | ४ | ६७ |
| टक्केवारी | २३.८८ | ३४.३३ | ८.९६ | २६.८७ | ५.९७ | |




प्रतिसाद श्रेणीची उत्तरे या पाच प्रतिसाद श्रेणीमध्ये समानपणे वितरीत झाली आहे की नाही, ते शोधण्यासाठी '***काय वर्ग'*** काढण्यात आला असून त्याची $\chi^2$ गणना करण्यात आली असून असे निदर्शनास आले की, $\chi^2$ = १९.६ एवढे असून ते (P =0.0061) एवढे लक्षणीय आहे. त्यामुळे असे निदर्शनास येते की, प्रतिसादाचे समान वितरण झाले नाही. मोठ्या संख्येने प्रतिसादक या विधानाशी सहमत होत नाही उदाहरणादाखल ३९ (५८.२१ % ) या आकड्यावरुन असे लक्षात येते की,वरील विधानाला प्रतिसादकांनी मान्य किंवा पूर्णपणे अमान्य केले आहे.

**निष्कर्ष :**


वरिल नमुद सामुग्रीच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांमध्ये कालपरत्वे बदल झालेला असून त्या विविध अंगानी चित्रपटामध्ये भूमिका साकारत असतात त्यामुळे चित्रपटांमध्ये मेंदूहिन असल्याचे त्यांचे सादरीकरण केले जात नाही.

**प्रश्न क्रमांक ५) : सुरुवातीपासून पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या चित्रपटातील भूमिका या दुय्यम दर्जाच्या असतात.**

प्रतिसादकांकडून मिळालेला प्रतिसाद खालीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक ५ ) हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या दुय्यम भूमिका**

| प्रतिसाद श्रेणी | पूर्णपणे मान्य | मान्य | अनिश्चित | अमान्य | पूर्णपणे अमान्य | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | -- | -- | ७ | ५१ | ९ | ६७ |
| टक्केवारी | -- | -- | १०.४५ | ७६.१२ | १३.४३ | |




प्रतिसाद श्रेणीची उत्तरे या पाच प्रतिसाद श्रेणीमध्ये समानपणे वितरीत झाली आहे की नाही, ते शोधण्यासाठी **'*काय वर्ग*'** काढण्यात आला असून त्याची $\chi^2$ गणना करण्यात आली असून असे निदर्शनास आले की, $\chi^2$ = १३६.८१ एवढे असून ते (P < .0001) एवढे लक्षणीय आहे. त्यामुळे असे निदर्शनास येते की, प्रतिसादाचे समान वितरण झाले नाही. मोठ्या संख्येने प्रतिसादक या विधानाशी सहमत होत नाही उदाहरणादाखल ६० (८९.५५ % ) या आकड्यावरुन असे लक्षात येते की,वरील विधानाला प्रतिसादकांनी मान्य किंवा पूर्णपणे अमान्य केले आहे.

## निष्कर्ष :

वरिल नमुद सामुग्रीच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांमध्ये बदल होत असून चित्रपटांत त्यांच्या भूमिका बदलाच्या मार्गावर असून त्यांना पुरुषांच्या तुलनेत दुय्यम भूमिका देण्यात येत नाही.

## चर्चा :

**'हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिकांचे चिकित्सक विश्लेषण'** या प्रस्तूत शोध निंबंधाच्या अनुषंगाने अनेक प्रतिसादकांकडून मिळालेल्या प्रतिसादावरुन किंवा त्यांच्या अभिप्रायावरुन असे लक्षात येते कि, दादासाहेब फाळके यांच्या ***राजा हरिश्चंद्र*** मधील निष्क्रिय पत्नी ते आईच्या भूमिकेतील ***मदर इंडिया*** मधील एकेरी पालकत्वाच्या भूमिकेत असणारी आई हे एक अद्भूत असून तो एक आव्हानात्मक प्रवास आहे. सुरुवातीपासूनच या क्षेत्राकडे स्त्रियांचा पाहण्याचा दृष्टिकोन,चित्रपटश्रृष्टिमध्ये त्यांचे झालेले उशीरा आगमन यामुळे हिंदी चित्रपटांत त्यांच्या वाट्याला आलेल्या दुय्यम दर्जाच्या आणि ठराविक किंवा पठणीतल्या भूमिका आता बदलू लागल्या आहेत. या भूमिका बदलाच्या दिशेने मार्गक्रमन करित आहेत. नाचगाण्यापलीकडेही या नायिकांनी उत्तम भूमिका साकारुन आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. आणि ही त्यांची जमेची बाजू आहे. ***परिणीता, ब्लॅक, नैना, जब वी मेट,*** विद्या बालन हिचा **डर्टी पिक्चर** आणि ***कहानी*** तर २०११ साली प्रदर्शित झालेला ***नो वन किल्ड जेसिका*** या गाजलेल्या प्रसिध्द चित्रपटांमध्ये नायिकांनी स्त्री पात्रांच्या भूमिकेला योग्य न्याय दिला आहे. त्याचप्रमाणे बॉक्स ऑफिसवरील मेलब्रिगेडला कॅटरिना कॅफ, मल्लिका शेरावत आणि समीरा रेड्डी या आयटम गर्लनी तोंड देत आपला वेगळा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला आहे. राणी मुखर्जीने यशराज बॅनरखाली काम करुन आपल्या अभिनयाचा ठसा उमटविला आहे. तीचा गाजलेला चित्रपट म्हणजे ***लागा चुनरी मे दाग***. या चित्रपटांध्ये राणी मुखर्जीने आपल्या अभिनयांने तिच्यातील कलागुणांचा ठसा उमटविला आहे. नवे कथानक , चित्रपटांच्या उत्तम संहिता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतीय चित्रपट यशाचे शिखर पादाक्रांत करतांना दिसतांत.

राजकपूरचा ***राम तेरी गंगा मैली*** असो किवा मधूर भांडारकचा ***चांदनी बार, फॅशन*** किंवा ***क्वीन,तनु वेड्स मनू*** किंवा नुकताच प्रदर्शित झालेला ***पिंक*** हा चित्रपट असो, या सर्व चित्रपटांधून स्त्रियांच्या भावनिक विश्वातील प्रश्नाना बाहेरील भौतिकवादी जगाशी मेळ घालतांना कोणत्या प्रश्नांना समोर जावे लागते किवा त्यांना वारंवार येणाऱ्या अडचणींवर त्या कशा मात करताना किवा त्यांची संघर्ष करण्याची तयारी, या सर्व भूमिका साकारतांना एवढे नक्कीच म्हणावे लागेल की भारतीय चित्रपटांमध्ये स्त्रियांचे रुप बदलत आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास हिंदी चित्रपटातील स्त्रियांच्या भूमिका या बदलाच्या वाटेवर आहेत.

## संदर्भ ग्रंथसुची आणि शोधप्रबंध :


1) Amitabh Baghchi, http://www.cs.jhu.edu/~bagchi/women.html
2) Nandkumar, Soumya "The Stereotypical Portrayal of Women in Commercial Indian Cinema" 2011
3) Chatterji, Shoma, "Subject: Cinema Object: Women: A study of the Portrayal of Women in Indian Cinema"
4) Sarkar, Srijita, "An analysis of Hindi women-centric films in India." (2012). *Electronic Theses and Dissertations.*
5) Pendakur , Manjunath, "Indian popular Cinema: Industry, Ideology, and Consciousness", The Hampton Press Communication Series.
6) Singh, Indubala, "Gender Relation and Cultural Ideology in Indian Cinema"

7) K. Moti Gokulsingh, Wimal Dissanaynayake, "Indian Popular Cinema: A Narrative of Cultural Change"
8) 60 Year of Indian Cinema (CD-Rom)
9) Seventy Five Years of Indian Cinema By Rangoonwala Feroze
10) Pandya, S. R. (2010). Educational Research. APH Publishing Corporation, New Delhi.
11) Gopalan, Lalitha, "Cinema of Interruptions: Action Genres in Contemporary Indian Cinema"




लीलाधर बन्सोड

संशोधक, जनसंवाद विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर.